Crompton

Crompton Greaves Consumer Electricals Limited
Registered & Corporate Office: Tower 3, 1st Floor,
East Wing, Equinox Business Park, LBS Marg,
Kurla (West), Mumbai 400 070. India
Tel: +91 22 6167 8499 F: +91 22 6167 8383
W: www.crompton.co.in. CIN : L31900MH2015PLC262254

Date: December 14, 2021

To, **BSE Limited ("BSE")**, Corporate Relationship Department, 2nd Floor, New Trading Ring, P.J. Towers, Dalal Street, Mumbai – 400 001.	To, **National Stock Exchange of India Limited ("NSE")**, "Exchange Plaza", 5th Floor, Plot No. C/1, G Block, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400 051.
BSE Scrip Code: 539876	**NSE Symbol: CROMPTON**
ISIN: INE299U01018	**ISIN: INE299U01018**
Our Reference: 118/2021-2022	**Our Reference: 118/2021-2022**

Dear Sir/Madam,

Sub: Compliance under Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations")

Pursuant to Regulation 47 of the Listing Regulations, please find enclosed herewith the newspaper clippings of the advertisement published on Tuesday, December 14, 2021 with respect to completion of dispatch of Postal Ballot notice in the following newspapers:

1. All India Edition of Financial Express
2. All Edition of Loksatta

The newspaper publication is also uploaded and available on our website at the following link: http://www.crompton.co.in

This is for your information and you are requested to kindly take the above information on your record.

Thanking you,

For **Crompton Greaves Consumer Electricals Limited**

Pragya Kaul

Pragya Kaul
Company Secretary & Compliance Officer

Encl: A/a

Sebi asks investment advisers, research analysts to put investor charter, plaint on websites, apps

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, December 13

SEBI ON MONDAY asked investment advisers and research analysts to disclose the investor charter as well as data pertaining to complaints received on their websites and mobile applications.

The new guidelines will come into effect from January 1, 2022, the Securities and Exchange Board of India (Sebi) said in two separate circulars.

In order to facilitate investor awareness about various activities which an investor deals with while availing the services provided by research analysts and investment advisers, Sebi has developed the investor charter for research analysts and investment advisers.

The charter is a brief document containing details of services provided to investors, their rights, dos and don'ts, responsibilities, investor grievance handling mechanism and estimated timelines thereof at one single place, in a lucid language for ease of reference.

Sebi has asked registered research analysts as well as investment advisers to bring to the notice of their clients the charter by prominently displaying it on their websites and mobile applications.

In case they do not have websites or mobile applications, then these entities will have to, as a one-time measure, send charter to the investors on their registered e-mail addresses.

Additionally, in a bid to bring about transparency in the investor grievance redressal mechanism, Sebi has asked them to disclose on their respective websites and mobile applications, all complaints including those received on SCORES in a prescribed format on a monthly basis.

Equitas SFB, Chola MS General Insurance in tie-up for women-specific health insurance

EQUITAS SMALL FINANCE Bank (Equitas SFB) on Monday announced it has partnered with Cholamandalam MS General Insurance to launch the Chola Sarva Shakti Policy, a women-specific health insurance policy to empower Indian women with good health and finances. The policy's benefits include insurance in case of personal accidents or any health crisis, health indemnity and maternity cover, support for child's education and EMI benefit to the insured in case of termination or temporary suspension from employment owing to health problems and helping hand cover for insured hospitalisation period, as well as genetic testing for mother and child. **—FE BUREAU**

Sebi order in matter related to insider trading in Infy scrip

SEBI ON MONDAY passed a confirmatory order against an Infosys employee and his connected person, who was an employee of Wipro, in a matter related to alleged insider trading in Infosys shares. Sebi said Ramit Chaudhari and Keyur Maniar "should desist from directly accessing the securities market till the completion of the ongoing investigation into the matter." **—PTI**

माजी अग्निशमन प्रमुख शशिकांत काळे बडतर्फ

राष्ट्रपती पदकासाठी खोटी कागदपत्रे दिल्याचा आरोप सिद्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : राष्ट्रपती पदकासाठी राज्य व केंद्र सरकारला खोटी माहिती सादर केल्याच्या प्रकरणावरून वादात सापडलेले माजी अग्निशमन प्रमुख शशिकांत काळे यांना अखेर सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. खात्यांतर्गत सुरू असलेल्या चौकशीत त्यांच्यावरील सर्वच सर्व आरोप सिद्ध झाले आहेत. पालिकेची प्रतिमा मलीन करण्याबरोबरच, राज्य सरकार, राज्यपाल व राष्ट्रपतींची दिशाभूल केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

दरवर्षी २६ जानेवारीला गुणवत्तापूर्वक सेवेसाठी राष्ट्रपती पदक देऊन अग्निशमन दलाचे अधिकारी व जवानांचा गौरव करण्यात येतो. हा सन्मान मिळविण्यासाठी गेल्यावर्षी तत्कालीन अग्निशमन प्रमुख अधिकारी शशिकांत काळे यांनी अन्य जवानांबरोबर स्वतःच्या नावाची शिफारस केली होती. मात्र स्वतःचे नाव देताना काळे यांनी चुकीची माहिती दिल्याचे आढळून आले. काळे यांनी गेल्या दहा वर्षांतील गोपनीय अहवालांची माहिती देताना 'अ उत्कृष्ट' अशी प्रतवारी देण्यात आल्याचे दाखवले होते. काळे यांना २०१४-१५ मध्ये पालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले होते. मात्र यावर्षीही 'अ उत्कृष्ट' मिळाल्याचे त्यांनी दाखवले होते. ही बाब निदर्शनास आल्यानंतर काळे यांना गेल्यावर्षी नोव्हेंबर २०२०मध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी पदावरून हटवण्यात आले. या गंभीर प्रकाराप्रकरणी काळे यांची सह आयुक्त (सामान्य प्रशासन) यांच्यामार्फत खात्यांतर्गत चौकशी सुरू करण्यात आली होती. तसेच पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी नगरविकास विभागाला पत्र पाठवून पदकासाठीची शिफारस तातडीने मागे घेतली होती. काळे यांना उप प्रमुख अग्निशमन अधिकारी पदावर पदावनत करण्यात आले होते. आता वर्षभरानंतर त्यांच्यावरील सर्व आरोप सिद्ध झाले असून त्यांना बडतर्फ करण्याची शिफारस प्रशासनाने केली आहे. तसा प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर मांडण्यात आला आहे.

काळे यांनी केलेल्या कृत्यामुळे मुंबई महापालिकेची प्रतिमा मलीन झाली असून प्रशासनाला गेल्यावर्षी पदकासाठीचा प्रस्ताव मागे घेऊन नवीन प्रस्ताव सादर करण्याची नामुष्की ओढवली होती. त्यांचे कृत्य हे नैतिक अधःपतन, वरिष्ठांची हेतुपुरस्सर आणि जाणीवपूर्वक, दूरस्थ हेतूने, दिशाभूल, वरिष्ठांचा विश्वासघात तसेच राज्य सरकार, राज्यपाल, राष्ट्रपती यांची दिशाभूल करणारे आहे, असा ठपका या चौकशीत ठेवण्यात आला आहे.

यापूर्वीही अवैध कृत्ये

काळे यांना आठ वर्षांपूर्वी अग्निशमन दलाचे पेट्रोल अवैधपणे चोरून काळ्या बाजारात विकल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले होते. दीड वर्षानंतर त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्यात आले. विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करून इमारतींना ना हरकत प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी काळे यांना ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला होता, तर माहीम येथील एका इमारतीच्या भोवती सहा मीटर मोकळ्या जागेची अट डावलून 'ना हरकत' प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी त्यांना निलंबित केले होते. काळे यांचा पूर्वइतिहास पाहता आतापर्यंत त्यांना चार विविध गुन्ह्यांसाठी निलंबनाची कारवाई तसेच दंड ठोठावण्यात आला आहे.

धावत्या लोकलवर प्लॅस्टिकची बाटली

लोकसत्ता प्रतिनिधी

अंबरनाथ: अंबरनाथ आणि उल्हासनगर स्थानकादरम्यान एका धावत्या लोकलवर प्लास्टिक बाटली आदळल्याने सोमवारी घबराट पसरली. दुपारी साडे १२च्या सुमारास अंबरनाथहून मुंबईकडे जाणाऱ्या लोकलच्या महिला डब्यावर ही बाटली आदळली. या घटनेची माहिती लोहमार्ग पोलीस आणि रेल्वे पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेत तपास केला. लहान मुले खेळत असताना खडीने भरलेली बाटली दारावर आदळल्याने हा प्रकार झाल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांनी दिली आहे. कोणत्याही प्रवाशाला इजा झाली नाही.

सोमवार दुपारी १२ वाजून २९ मिनिटांनी अंबरनाथ स्थानकातून सुटलेली मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल स्थानकातून काही अंतरावर गेली असता लोकलच्या मुंबई दिशेच्या महिला डब्याच्या दरवाजाजवळ एक प्लास्टिकची बाटली येऊन आदळली. या बाटलीमुळे त्या भागात धूळ पसरली. या प्रकारानंतर दारात असलेल्या दोन महिला घाबरल्या. या दोन्ही महिला उल्हासनगर स्थानकात उतरल्यानंतर तात्काळ या प्रकाराची माहिती लोहमार्ग पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने या प्रकाराची खातरजमा करण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. या परिसरातील झोपडपट्टी परिसरात रेल्वे रुळाच्या बाजूला काही लहान मुले खेळत होती. प्लास्टिक बाटल्यांमध्ये खडी टाकून हवेत उडण्याचा खेळ खेळत असताना त्यातील एक बाटली लोकलच्या डब्यावर आदळली आणि त्यामुळे डब्याच्या दारात धूळ पसरली. यातील तीनही मुले अनुक्रमे नऊ, आठ आणि सात वर्षांची होती, अशी माहिती कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व्ही. डी. शार्दूल यांनी दिली.

शिळफाटा रस्त्यावरील टाटा नाका भागात वाहतूक कोंडी

प्रतिनिधी लोकसत्ता

डोंबिवली : कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील नेतिवली नाका ते टाटा नाकादरम्यान रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम एमएसआरडीसीतर्फे सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे या भागात दररोज वाहतूक कोंडी होत आहे, असे या भागातील रहिवासी, व्यापाऱ्यांनी सांगितले.

कल्याण, डोंबिवली, २७ गावे भागात सोमवारी मोठ्या संख्येने विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले. मुंबई, नवी मुंबई परिसरातून वाहने एकाचवेळी शहरात आल्याने वाहन संख्या वाढली. त्यामुळे या भागात कोंडी झाली. या रस्त्यावरून अवजड वाहने धावत असल्याने कोंडीत भर पडते आणि रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागतात, असे एका वाहतूक पोलिसाने सांगितले.

सोमवारी संध्याकाळी वाहनकोंडी झाली त्यावेळी या भागात एकही वाहतूक पोलीस तैनात नव्हता. काही जागरुक रहिवासी, काही वाहन चालक वाहने बंद ठेवून मध्ये घुसलेल्या वाहनांना बाजूला करून मुख्य रस्त्यावरील वाहने पुढे जातील यासाठी प्रयत्न करत होते. नोकरदार कामावरून परतण्याच्या वेळेत ही कोंडी झाल्याने नोकरदार वर्गाला अधिक मनस्ताप सहन करावा लागला. अनेक वऱ्हाडी या कोंडीत अडकल्याने ते संताप व्यक्त करत होते. टाटा नाका ते नेतिवली दरम्यान रस्ता काँक्रीटीकरणाचे काम आणखी काही दिवस सुरू होणार आहे. या भागात कायमस्वरूपी वाहतूक पोलीस, वाहतूक सेवक तैनात ठेवावेत, अशी मागणी काही प्रवाशांनी केली.

अत्यावश्यक कर्मचारी, प्रतिकारशक्ती क्षीण असलेल्यांना वर्धक मात्रा गरजेची

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : भारतात उपलब्ध असलेल्या कोव्हिशिल्ड आणि कोव्हॅक्सिन यांच्या वर्धक मात्रेबाबत संशोधनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे, परंतु या अभ्यासाचे निष्कर्ष जाहीर होण्याची वाट न पाहता आरोग्य, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आणि रोगप्रतिकारकशक्ती कमी असलेल्या व्यक्तींना लवकरात लवकर लशींची वर्धक मात्रा देणे गरजेचे आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

करोना लशीच्या पहिल्या टप्प्यामध्ये आरोग्य आणि अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी यांना लस दिली गेली. या वर्गाला

तज्ज्ञांचे मत

लस देऊन आता जवळपास वर्ष होत आले असल्यामुळे यांना वर्धक मात्रा देणे गरजेचे आहे, असे मत अनेक संशोधकांकडून व्यक्त केले जात आहे. परंतु कोणत्या लशीची वर्धक मात्रा द्यावी याबाबत अनेक मतमतांतरे सध्या समोर येत आहेत.

भारतात उपलब्ध असलेल्या कोव्हॅक्सिन आणि कोव्हिशिल्ड यांच्या वर्धक मात्रेबाबत सध्या संशोधनात्मक अभ्यास जाहीर झालेला नाही. त्यामुळे याबाबतचा अभ्यास होणे गरजेचे आहे. असा अभ्यास उपलब्ध असल्यास तो जाहीर होणे आवश्यक आहे, असे मत राष्ट्रीय करोना कृती दलातील सदस्य डॉ. राहुल पंडित यांनी व्यक्त केले. पाश्चात्त्य देशांमध्ये वर्धक मात्रेबाबत अभ्यास झाला असून याचे निष्कर्षही जाहीर झाले आहेत. आपल्याकडे वर्धक मात्रेबाबत अभ्यास झाला नसल्याने असा संशोधनात्मक अभ्यास केंद्रीय आरोग्य विभागाने करायला हवा. परंतु या सर्व प्रक्रियेला वेळ लागणार आहे. ओमायक्रॉन घातक नसला तरी वेगाने पसरणारा विषाणूचा प्रकार आहे. तेव्हा या पार्श्वभूमीवर जोखमीच्या गटांना तरी लगेचच वर्धक मात्रा द्यायला हवी, असे मत करोना कृती दलाचे सदस्य डॉ. शशांक जोशी यांनी व्यक्त केले.

वर्धक मात्रा ही दोन विविध प्रकारच्या लशींची दिल्यास अधिक फायदेशीर असल्याचे पाश्चात्त्य देशांमधील अभ्यासांमधून निदर्शनास आले आहे. त्यामुळे आपल्याकडेही कोव्हिशिल्ड घेतलेल्यांना कोव्हॅक्सिनची आणि कोव्हॅक्सिन घेतलेल्यांना कोव्हिशिल्डची वर्धक मात्रा देता येईल का याचा विचारही होणे गरजेचे आहे. वर्धक मात्रांबाबतचे आपल्याकडील अभ्यास जाहीर होण्यास बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाश्चात्त्य देशांमधील लशींच्या निष्कर्षांचा अभ्यास करून सध्या काही जोखमीच्या गटांना वर्धक मात्रा सुरू करणे आवश्यक आहे, असे मत लोकमान्य टिळक रुग्णालयातील माजी सूक्ष्मजीवशास्त्रतज्ज्ञ डॉ. सुजाता बावेजा यांनी व्यक्त केले.

'सरसकट वर्धक मात्रेसाठी घाई नको!'

सध्या मोठ्या लोकसंख्येला लशीची पहिली मात्रा प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सरसकट वर्धक मात्रेबाबत मागणी करणे निश्चितच रास्त नाही. संशोधनात्मक अभ्यास समोर आल्यानंतरच याबाबत विचार केला जावा, असे साथरोगतज्ज्ञ डॉ. टी. सुंदरमन यांनी स्पष्ट केले.

तपासात सहकार्य केल्यास कंगनाला अटक नाही

मुंबई पोलिसांचे न्यायालयात स्पष्टीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : शिखांविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्याच्या तपासात सहकार्य केल्यास अभिनेत्री कंगना रणावतवर २५ जानेवारीपर्यंत अटकेची कारवाई करणार नाही, असे मुंबई पोलिसांतर्फे सोमवारी उच्च न्यायालयात सांगण्यात आले.

कंगनाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचा व्यापक प्रश्न येथे संबंधित आहे. त्यामुळे तिला काही प्रमाणात तातडीचा दिलासा देण्याची गरज आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केल्यावर कंगनावर २५ जानेवारीपर्यंत अटकेची कारवाई करणार नसल्याचे पोलिसांतर्फे सांगण्यात आले. कंगनावर दाखल गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी तिने केलेल्या याचिकेवर आरोपांचा विचार केला तर त्यानुसार एखादी व्यक्ती किंवा समुदायाच्या हेतुतः भावना दुखावणे स्पष्ट झाले पाहिजे. कंगनाने मात्र शीख समुदायाविरोधात हेतुतः कोणतेही वक्तव्य केलेले नाही, असा दावा कंगनाच्या वकिलाने केला. त्याची दखल घेत याप्रकरणी कंगनाने हेतुतः वक्तव्य केल्याचे कुठे दिसते, असा प्रश्न न्यायालयाने सरकारी वकिलांना केला. तसेच कंगनाला अटक करणार आहात का, अशी विचारणाही केली.

त्यावर चौकशीसाठी कंगनाला नोटीस बजावून हजर राहण्यास सांगितले होते. मात्र तिच्याकडून काहीच प्रतिसाद देण्यात आला नाही. तिच्याकडून सहकार्य केले जात नसल्याचे सरकारी वकील अरुणा पै यांनी न्यायालयाला सांगितले. तर कंगना पोलिसांसमोर हजर होण्यास तयार आहे; पण तिला अटक होण्याची भीती आहे, असे कंगनाच्या वतीने सांगण्यात आले. कंगनाने तपासात सहकार्य केल्यास तिला अटक केली जाणार नसल्याची हमी सरकारी वकिलांनी दिली.

माथेरान खून प्रकरणाची २४ तासात उकल

महिलेची हत्या करणाऱ्या आरोपीस अटक

लोकसत्ता, खास प्रतिनिधी

अलिबाग : माथेरान येथील खून प्रकरणाची २४ तासांत उकल करण्यात रायगड पोलिसांना यश आले आहे. पतीकडून या महिलेची निघृण हत्या करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीला जेरबंद करण्यातही पोलिसांना यश आले आहे.

रविवारी सकाळी माथेरान येथील इंदिरा नगर परिसरात एका खाजगी लॉजमध्ये शीर नसलेला निर्वस्त्र मृतदेह आढळून आला होता. अतिशय क्रूरपणे या महिलेची हत्या करण्यात आली होती. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून शीर धडापासून वेगळे करण्यात आले होते, तर महिलेच्या हातावर गोंदलेले नावही नष्ट करण्यात आले होते. या गुन्ह्याची उकल करणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

गुन्ह्याचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अशोक दुधे आणि अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आठ पथकांच्या मदतीने पोलीस तपास सुरू करण्यात आला होता.

सुरुवातीला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने पोलिसांनी लॉजमध्ये राहायला आलेल्या जोडप्याचे फोटो मिळवले. त्यानंतर पुढील तपास सुरू केला. तपासादरम्यान घटनास्थळापासून काही अंतरावर झुडपात एक बॅग आढळून आली. या बॅगमध्ये गोरेगावचा पत्ता असलेली दवाखान्याची एक चिठ्ठी सापडली. यानंतर पोलिसांनी गोरेगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. तेव्हा गोरेगाव येथून पूनम पाल ही महिला बेपत्ता असल्याचे समोर आले. ती आपल्या पतीला भेटण्यासाठी घरातून बाहेर पडली असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे तपासाला दिशा मिळाली. शीर नसलेला मृतदेह तिचाच असल्याचे निष्पन्न झाले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये तिच्यासोबत दिसणारी व्यक्ती हा तिचापतीच असल्याचेही समोर आले. त्यामुळे त्याचा शोध पोलिसांनी सुरू केला. तपासाची चक्रे फिरवून त्याला पनवेल येथून ताब्यात घेतले आणि या प्रकरणाचा उलगडा झाला.